# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका

सार्वत्रिक निवडणूक – २०१७

विषय - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यासाठी राखीव जागांचे वाटप करणे व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला इ. करिता आरक्षण सोडत दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजीचे कार्यक्रमाचे इतिवृत्त.

**स्थळ- प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड, पुणे-३३ वेळ -७/१०/२०१६ सकाळी ११ वाजता**

---

मा. राज्य निवडणूक आयोगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१७ साठी दिनांक २० ऑगस्ट २०१६ रोजीचे आदेशान्वये प्रभाग रचना, आरक्षण, सोडत, सुनावणी इत्यादी कार्यक्रमाचे वेळापत्रक ठरवून दिलेले होते. त्यानुसार प्रारुप प्रभाग रचना ( अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे प्रभागासह) प्रस्तावास दिनांक. २३ सप्टेंबर २०१६ रोजी मान्यता मिळालेली आहे. मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेशानुसार शुक्रवार दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यासाठी राखीव जागांचे वाटप करणे व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला इ. करिता आरक्षण सोडत कार्यक्रम आयोजीत करणेबाबतची जाहीर नोटीस दि.०४/१०/२०१६ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे, त्यानुसार आरक्षण सोडत कार्यक्रम आयोजीत केला आहे.

मा.राज्य निवडणूक आयोगाने दि. २३ सप्टेंबर २०१६ रोजी मान्यता दिलेल्या प्रारूप प्रभाग रचना व्याप्ती, नकाशा महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आला तसेच सकाळी १०.०० वाजता प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड, पुणे-३३ या ठिकाणी नागरीकांचे माहितीसाठी प्रसिध्द करणेत आला. नागरिकांना प्रारूप प्रभाग रचनेचे आरक्षण व सोडत कार्यक्रमाबाबत सविस्तर माहितीचे प्रसिध्दीपत्रक नागरिक सोडत कार्यक्रमासाठी प्रेक्षागृहात प्रवेश करताना वाटप करणेत आले.

या कार्यक्रमाचे संपूर्णत: व्हिडीओ चित्रीकरण करणेत आले. या कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

१) मा. दिनेश वाघमारे, आयुक्त सो.

२) मा. तानाजी शिंदे, अतिरिक्त आयुक्त सो.

३) मा. डॉ. यशवंतराव माने, सहा. आयुक्त, निवडणूक

४) उपस्थित सर्व नागरीक

सर्वप्रथम श्री अण्णा बोदडे, जनसंपर्क अधिकारी, यांनी सर्व उपस्थित नागरिक व मा.आयुक्त यांचे स्वागत केले. मा. राज्य निवडणूक आयोगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मुदत सन २०१७ मध्ये संपुष्टात येत असून सार्वत्रिक निवडणूक अधिनियमातील तरतुदीनुसार तत्पूर्वी घेणे आवश्यक असलेने महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूक २०१७ साठी प्रभाग रचना करणेबाबतचे वेळापत्रक दिनांक

२०/८/२०१६ चे आदेशान्वये ठरवून दिलेले आहे. त्यानुसार राखीव जागांचे आरक्षण, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला इत्यादी करीता आरक्षण सोडतीचे कार्यक्रम होत असल्याची जाहीर करण्यात आले. यानंतर प्रारूप प्रभाग रचनेचे व आरक्षण सोडतीचे नियमावलीबाबत डॉ.यशवंतराव माने यांनी प्रस्तावित केले.

मा. राज्य निवडणूक आयोगाने सन २०११ ची लोकसंख्या गृहीत धरुन प्रारुप प्रभाग रचना करणेबाबत आदेशित केले आहे. प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे प्रभागासह ) तयार करणेत येवून मा. विभागीय आयुक्त , महानगरपालिका आयुक्त व मा.जिल्हाधिकारी यांचे समितीने मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडे मान्यतेसाठी सादर केला होता. या प्रस्तावास मा. राज्य निवडणूक आयोगाने दि २३/९/२०१६ रोजी मान्यता दिलेली आहे. सन २०११ चे जनगणनेनुसार लोकसंख्या खालीलप्रमाणे असलेचे नागरिकांना माहिती देणेत आली.

**महानगरपालिकेची एकूण लोकसंख्या - १७,२७,६९२**

**अनुसूचित जातीची लोकसंख्या - २,७३,८१०**

**अनुसूचित जमातीची लोकसंख्या - ३६,५३५**

मा. राज्य शासनाने दि. १९/५/२०१६ रोजीचे अध्यादेशान्वये बहुसदस्य प्रभाग पध्दत लागू केली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेची सदस्य संख्या १२८ इतकी होत आहे. तसेच ४ सदस्यांचा एक प्रभाग या प्रमाणे ३२ प्रभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता होत आहेत. प्रभागातील जागांना 'अ', 'ब','क','ड' असे संबोधण्यात आलेले आहे. उदा.प्रभाग क्र.५ मध्ये ४ जागा आहेत त्यांना '५अ',' ५ब', '५क','५ड' असे संबोधण्यात आलेले आहे.

मा. राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या प्रारुप प्रभाग रचनेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता प्रवर्गनिहाय सदस्य संख्या खालीलप्रमाणे असलेबाबत उपस्थित सर्व नागरिकांना माहिती देण्यात आली.

| | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | नागरिकांचा मागसवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १० | ०१ | १७ | ३६ | ६४ |
| महिला | १० | ०२ | १८ | ३४ | ६४ |
| एकूण | २० | ०३ | ३५ | ७० | १२८ |

अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील राखीव जागांचे आरक्षण तसेच नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिलांकरीता इ. जागांचे सोडत कार्यक्रम मा. आयुक्त यांचे उपस्थितीत पार पाडणेबाबत मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश आहेत. त्यानुसार आज दि. ७/१०/२०१६ रोजी सोडत काढणेचा कार्यक्रम होत आहे असे घोषित करण्यात आले.

मा. राज्य शासनाने दि. १३/६/२०१६ रोजीचे अधिसुचनेद्वारे प्रभागामध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका नियम २०१६ निर्गमित केले आहेत. त्यातील नियमानुसार नियम ३-अनुसूचित जाती, नियम ४, अनूसूचित जमाती, नियम ५- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नियम ६- महिलांसाठी जागा वाटप यानुसार राखीव जागांचे आरक्षण व सोडत याबाबतचे टप्प्यांची उपस्थितांना माहिती देण्यात आली.

१) **अनुसूचित जातीसाठीचे जागा आरक्षण** – मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार नियम ३ मधील तरतुदी नुसार अनुसूचित जाती साठीच्या मा. राज्य निवडणूक आयोगाने दि. २०/८/२०१६ रोजीच्या आदेशात दिलेल्या सूत्रानुसार अनुसूचित जातीची लोकसंख्या (२,७३,८१०) / एकूण लोकसंख्या (१७,२७,६९२) x एकूण सदस्य संख्या (१२८) = २० इतक्या जागा अनुसूचित जातीसाठी आरक्षित आहेत. या जागा अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी त्या प्रभागातील एकूण लोकसंख्येच्या टक्केवारी त्या प्रभागातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक असेल अशा प्रभागा पासून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने २० प्रभागातील १ जागा अनुसूचित जाती करीता आरक्षित करणेत येणार आहे.

२) **अनुसूचित जमातीसाठीचे जागा आरक्षण** – मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार नियम ४ मधील तरतुदी नुसार अनुसूचित जमाती साठीचे जागा मा. राज्य निवडणूक आयोगाने दि. २०/८/२०१६ रोजीच्या आदेशात दिलेल्या सूत्रानुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या (३६,५३५) / एकूण लोकसंख्या (१७,२७,६९२) x एकूण सदस्य संख्या (१२८) = ३ इतक्या जागा अनुसूचित जमातीसाठी आरक्षित आहेत. या जागा अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी त्या प्रभागातील एकूण लोकसंख्येच्या टक्केवारी त्या प्रभागातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक असेल अशा प्रभागापासून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने ३ प्रभागातील १ जागा अनुसूचित जमातीकरीता आरक्षित करणेत येणार आहे.

३) **नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा आरक्षण** - मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार नियम ५ मधील तरतुदी नुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग साठीच्या जागा. मा. राज्य निवडणूक आयोगाने दि. २०/८/२०१६ रोजीच्या आदेशात दिलेल्या सूत्रानुसार एकूण सदस्य संख्या (१२८) x २७ / १०० = ३५ इतक्या जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग साठी आरक्षित आहेत.

**नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील ३२ जागांचे आरक्षण** - नियम ५ मधील तरतुदीनुसार प्रथम प्रत्येक प्रभागातील १ जागा याप्रमाणे ३२ प्रभागातील ३२ जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग साठी आरक्षित करणेची तरतूद आहे. त्यानुसार ३२ जागा आरक्षित करणेत येतील.

**नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग मधील उर्वरीत ३ जागांचे आरक्षण** - नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यासाठी आरक्षित झालेल्या वरील ३५ पैकी ३२ जागा थेट आरक्षित करण्यात आल्यानंतर

उर्वरीत ३ जागा नियम ५ (१) (ब) ( दोन ) मधील तरतुदीनुसार बिनराखीव राहिलेल्या असतील त्या प्रभागामधून सोडतीने नेमून देणेची तरतूद आहे . त्यानुसार सोडतीची कार्यवाही करणेत येणार आहे.

४) **महिलांसाठी जागा आरक्षण** – नियम ६ मधील तरतुदीनुसार प्रत्येक प्रभागातील २ जागा (५० टक्के) या महिलांसाठी राखून ठेवणेची सर्वसाधारण तरतूद आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे महिलांसाठी आरक्षणाची प्रक्रिया होईल.

**i) अनुसूचित जातीतील महिलांसाठी** – मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार अनुसूचित जातीसाठी एकूण २० जागा राखीव आहेत.त्यामधून १० जागा चिठ्ठया काढून सोडतीने आरक्षित करण्यात येतील.

**ii) अनुसूचित जमातीतील महिलांसाठी** – मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार अनुसूचित जातीसाठी एकूण ३ जागा राखीव आहेत.त्यामधून २ जागा चिठ्ठया काढून सोडतीने आरक्षित करण्यात येतील.

**iii) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठींचे जागांचे आरक्षण** - मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील आरक्षित झालेल्या ३५ जागांपैकी महिलांसाठी राखून ठेवावयाच्या ५० टक्के जागा म्हणजे १८ जागा महिलांसाठी खालील प्रमाणे आरक्षित करण्यात येतील.

अ) नियम ६ (३) (अ) मधील तरतूदीनुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गा करीता २ जागा राखीव असतील त्या प्रभागातील १ जागा थेट पध्दतीने महिलांसाठी आरक्षित ठेवण्याची तरतूद आहे.

ब) यानंतर नियम ६ (३)(ब) मध्ये एक किंवा अधिक जागा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा दोन्ही करीता राखीव असतील, परंतु त्या जागा त्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव नसतील तर अशा प्रभागातील **नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची जागा महिलांकरीता थेट आरक्षित ठेवण्यात येतील अशी तरतूद आहे**

क) नियम ६ (३) (क) मध्ये अशा प्रकारे जागा नेमून दिल्यानंतर, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरीता राखीव असलेल्या कोणत्याही जागा शिल्लक राहत असतील तर, त्या जागा नियम ६ (३) (अ) आणि नियम ६ (३) (ब) यामध्ये नमूद केलेले मात्र ५ जागा नसलेले प्रभाग आणि ज्या प्रभागामध्ये नियम १ अनुसार अशा आरक्षणासाठी विहीत केलेल्या संख्यात्मक मर्यादेपर्यंत महिलांसाठी अगोदरच जागा राखून ठेवलेल्या असतील असे प्रभाग वगळून उर्वरीत प्रभागामधून सोडतीने नेमून देण्याची तरतूद आहे. त्यानुसार उर्वरीत जागांची सोडतीने काढण्यात येतील.

**iv) सर्वसाधारण महिलांसाठीच्या जागा** - यानंतर सर्वसाधारण महिलांकरीता नियम ६ (४) तरतुदीनुसार ज्या प्रभागामध्ये २ जागा महिलांकरीता आरक्षित झालेल्या नाहीत. त्या प्रभागात ते

प्रमाण पूर्ण करण्या करीता आवश्यक असलेल्या प्रमाणात सर्वसाधारण महिलांच्या ३४ जागा आरक्षित करण्यात येतील.

५) मा. राज्य निवडणूक आयोगाने आरक्षणाची सोडत काढणेबाबत दि. २०/८/२०१६ चे आदेशा सोबतचे परिशिष्ठ ११ मध्ये मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. त्यामध्ये सोडतीसाठी पारदर्शक ड्रम वापरणेत यावा, ड्रम मध्ये टाकावयाचा चिठ्ठयांचा आकार कमीत कमी A/4 या आकाराचा असावा. चिठ्ठी रोल करुन त्यावर लावणेत येणारे रबरबँड एकाच रंगाचे असावे व ते चिठ्ठीचे मध्यभागी लावावे. तसेच सोडत शालेय विद्यार्थ्यांमार्फत काढणेत यावी असे नमूद आहे. ज्या जागा सोडतीने आरक्षित करावयाच्या आहेत, त्या जागांचे सोडतीबाबत मा. राज्य निवडणूक आयोगाचे या मार्गदर्शक तत्वानुसार सोडतीची कार्यवाही होईल असे सांगणेत आले. त्यानंतर डॉ.यशवंतराव माने यांनी सर्व नागरिकांनी शांतता राखून सोडतीचे कार्यक्रमास सहकार्य करावे असे आवाहन केले.

**राखीव जागांचे आरक्षण व सोडतीची प्रक्रिया श्री मनोज लोणकर, प्र.क्षेत्रिय अधिकारी यांनी सुत्रसंचालन करून सुरु केली.**

६) **अनुसूचित जाती साठीचे जागा आरक्षण -** मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार नियम ३ मधील तरतुदीनुसार प्रभागातील अनुसूचित जातीच्या उतरत्या क्रमाने लोकसंख्येनुसार २० प्रभागांची यादी स्क्रीनवर दाखविणेत आली. तसेच नागरिकांना वाचून दाखविण्यात आली. त्यानुसार अनुसूचित जातीसाठी आरक्षित होणा-या २० प्रभागातील जागा "अ" ही अनुसूचित जातीसाठी २० जागा आरक्षित होत असलेचे घोषित करण्यात आले.

**प्रभाग क्रमांक – १९अ, १३अ, ३०अ, २३अ, २५अ, ९अ, ११अ, १६अ, २०अ, ३२अ,**
**१०अ, २९अ, २७अ, २१अ, ३१अ, १अ, २६अ, ८अ, ४अ, २४अ**

अनुसूचित जाती साठी आरक्षित झालेल्या जागांचे क्रमांक स्क्रीनवर व वाचून दाखविण्यात आले.

७) **अनुसूचित जातीच्या महिलांसाठीचे जागा आरक्षण -** नियम ६ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी प्रभागातील २ जागा (५० टक्के) या महिलांसाठी राखून ठेवणेची तरतूद आहे. त्यानुसार अनुसूचित जातीसाठी आरक्षित झालेल्या २० जागांमधून १० जागा अनुसूचित जातीच्या महिलांसाठी सोडतीने नेमून देणे आवश्यक आहे. यासाठीची प्रक्रिया सुरु होत असल्याचे सांगणेत आले. प्रथम पारदर्शक ड्रममध्ये कोणत्याही प्रकारची चिठ्ठी नसून ड्रम रिकामा असलेबाबत उपस्थित नागरिकांना दाखविणेत आला. यानंतर अनुसूचित जातीच्या आरक्षित झालेल्या २० प्रभागातील जागांच्या चिठ्ठया एक-एक करुन प्रभागाचा क्रमांक नागरिकांना दर्शवून वाचून दाखविणेत आला. प्रभागातील २० जागेच्या चिठ्ठया रोल करुन त्याच्या मधोमध रबरबँड (Pink) लावून चिठ्ठया ड्रममध्ये टाकणेची कार्यवाही सुरु करणेत आली.

सोडतीस उपस्थित श्री. मारुती भापकर यांनी चिठ्ठयांना जो रबरबँड लावत आहात तो वेगवेगळया रंगाचा आहे का, की एकाच रंगाचा आहे, याबाबत प्रश्न उपस्थित केला. यावर रबरबँड एकाच रंगाचे असून रबरबँडचा रंग गुलाबी आहे असे प्रत्यक्ष दाखविणेत आले व व्हीडीओ चित्रिकरण ही दाखविणेत आले. तसेच रबरबँड सर्व एकाच रंगाचे असलेबाबत नागरिकांना स्टेजवरुन दाखविण्यात आले. त्यावर श्री. भापकर यांनी शंकेचे समाधान झालेचे सांगितले.

ड्रम उलट-सुलट दिशेने फिरवून चिठ्ठयांची सरमिसळ उलटसुलट करणेत आली. सरमिसळ करणेत आलेल्या चिठ्ठयांमधून अनुसूचित जातीचे महिलांसाठी नेमून देणेच्या १० जागांची सोडत शालेय विद्यार्थ्यांमार्फत काढणेची कार्यवाही सुरु करणेत आली. सोडतीमध्ये निघालेल्या प्रत्येक चिठ्ठीचा क्रमांक शालेय विद्यार्थ्याने नागरिकांना दर्शवून व वाचून दाखविला. अशाप्रकारे अनुसूचित जातीचे महिलांसाठीचे १० जागांचे सोडत कार्यवाही पूर्ण करणेत आली. त्यांचे चिठ्ठयांचे क्रमांक खालीलप्रमाणे.

| चिठ्ठी | सोडतीने चिठ्ठीत निघालेल्या प्रभागाचा क्रमांक |
|---|---|
| पहिली चिठ्ठी | ०८ |
| दुसरी चिठ्ठी | १३ |
| तिसरी चिठ्ठी | २६ |
| चौथी चिठ्ठी | २० |
| पाचवी चिठ्ठी | २५ |
| सहावी चिठ्ठी | २१ |
| सातवी चिठ्ठी | २३ |
| आठवी चिठ्ठी | ०९ |
| नववी चिठ्ठी | १० |
| दहावी चिठ्ठी | ११ |

अशाप्रकारे अनुसूचित जातीच्या महिलांसाठी आरक्षित झालेल्या १० जागांचे क्रमांक नागरिकांना स्क्रीनवर दर्शवून व वाचून दाखविण्यात आले. तसेच खालील नमूद प्रभागातील जागा अनुसूचित जातीच्या महिलांसाठी आरक्षित झालेचे घोषित करणेत आले.

| अनु. क्र. | जागा क्रमांक |
|---|---|
| १ | प्रभाग क्रमांक ०८ जागा अ |
| २ | प्रभाग क्रमांक १३ जागा अ |
| ३ | प्रभाग क्रमांक २६ जागा अ |
| ४ | प्रभाग क्रमांक २० जागा अ |
| ५ | प्रभाग क्रमांक २५ जागा अ |
| ६ | प्रभाग क्रमांक २१ जागा अ |
| ७ | प्रभाग क्रमांक २३ जागा अ |

| | |
|---|---|
| ८ | प्रभाग क्रमांक ०९ जागा अ |
| ९ | प्रभाग क्रमांक १० जागा अ |
| १० | प्रभाग क्रमांक ११ जागा अ |

८) **अनुसूचित जमाती साठीचे जागा आरक्षण –** मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार प्रभागातील अनुसूचित जमातीच्या उतरत्या क्रमाने लोकसंख्येनुसार ३ प्रभागांची यादी स्क्रीनवर दर्शवून व नागरिकांना वाचून दाखविण्यात आली. त्यानुसार अनुसूचित जमातीसाठी प्रभागातील जागा खालील ३ जागा आरक्षित होत असलेचे घोषित करण्यात आले.

**१) प्रभाग क्रमांक – ४ जागा ब**

**२) प्रभाग क्रमांक – २९ जागा ब**

**३) प्रभाग क्रमांक – ६ जागा अ**

९) **अनुसूचित जमाती महिलांसाठीचे जागा आरक्षण –** नियम ६ मधील तरतूदीनुसार महिलांसाठी ५० टक्के जागा आरक्षित ठेवणेची तरतूद असलेने अनुसूचित जमातीचे आरक्षित झालेल्या ३ जागांपैकी २ जागा महिलांसाठी सोडतीने नेमून देणे आवश्यक आहे. अनुसूचित जमातीचे ३ जागांपैकी २ जागा महिलांसाठी आरक्षित करावयाच्या आहेत. यासाठीची प्रक्रिया सुरु होत असल्याचे सांगणेत आले.

प्रथम पारदर्शक ड्रममध्ये कोणत्याही प्रकारची चिठ्ठी नसून ड्रम रिकामा असलेबाबत उपस्थित नागरिकांना दाखविणेत आला. यानंतर अनुसूचित जमातीच्या आरक्षित झालेल्या ३ प्रभागातील जागांच्या चिठ्ठया एक एक करुन प्रभागाचा क्रमांक नागरिकांना वाचून दाखविणेत आला. प्रभागातील ३ जागेच्या चिठ्ठया रोल करुन त्याच्या मधोमध रबरबँड लावून चिठ्ठया ड्रममध्ये टाकणेत आल्या. ड्रम उलट-सुलट दिशेने फिरवून चिठ्ठयांची सरमिसळ उलटसुलट करणेत आली. सरमिसळ करणेत आलेल्या चिठ्ठयांमधून अनुसूचित जमातीचे महिलांसाठी नेमून देणेच्या २ जागांची सोडत शालेय विद्यार्थ्यांमार्फत काढणेची कार्यवाही सुरु करणेत आली.

सोडतीमध्ये निघालेल्या प्रत्येक चिठ्ठीचे क्रमांक शालेय विद्यार्थ्यांने नागरिकांना वाचून दाखविले. अशाप्रकारे अनुसूचित जमातीचे महिलांसाठीचे २ जागांचे सोडत कार्यवाही पूर्ण करणेत आली.

| चिठ्ठी | सोडतीने चिठ्ठीत निघालेल्या प्रभागाचा क्रमांक |
|---|---|
| पहिली चिठ्ठी | ०६ |
| दुसरी चिठ्ठी | २९ |

अशाप्रकारे आरक्षित झालेल्या २ जागांचे क्रमांक नागरिकांना स्क्रीनवर दर्शवून व वाचून दाखविण्यात आले. खालील नमूद प्रभागातील जागा अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी आरक्षित झालेचे घोषित करणेत आले.

१) प्रभाग क्रमांक – ६ जागा अ

२) प्रभाग क्रमांक – २९ जागा ब

१०) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा आरक्षण - मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार नियम ५ मधील तरतुदी नुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग साठीच्या जागा आरक्षणाची प्रक्रिया सुरु करण्यात आली. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३५ जागा आरक्षित करावयाच्या आहेत. या जागा प्रथम प्रत्येक प्रभागातील १ जागा याप्रमाणे ३२ प्रभागातील प्रत्येकी १ प्रमाणे ३२ जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग करीता थेट आरक्षित करणेत येत असलेचे घोषित करणेत आले.

| प्रभाग क्रमांक | जागा " अ " | जागा " ब " | जागा " क " | जागा " ड " |
|---|---|---|---|---|
| १ | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| २. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| ३. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| ४. | -- | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- |
| ५. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| ६. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| ७. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| ८. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| ९. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| १०. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| ११. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| १२. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| १३. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| १५. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| १६. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| १७. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| १८. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| १९. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| २०. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| २१. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| २२. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| २३. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| २४. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| २५. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| २६. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| २७. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| २८. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- | -- |
| २९. | -- | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- |
| ३०. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| ३१. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |
| ३२. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | -- | -- |

उपस्थित नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील आरक्षित झालेल्या ३२ जागांचे क्रमांक स्क्रीनवर दर्शवून व वाचून दाखवून घोषित करणेत आले.

**११)नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (३५) मधील उर्वरीत ३ जागांचे आरक्षण -** नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यासाठी आरक्षित झालेल्या वरील ३५ पैकी ३२ जागा थेट आरक्षित करण्यात आल्या. उर्वरीत ३ जागा नियम ५ (१) (ब) ( दोन ) मधील तरतुदीनुसार बिनराखीव राहिलेल्या असतील त्या प्रभागामधून सोडतीने नेमून देणेची तरतूद आहे. मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार असे बिनराखीव असलेले प्रभाग खालीलप्रमाणे असलेचे सांगणेत आले.

**प्रभाग क्रमांक – ५, २, ३, ७, १२, १४, १५, १७, १८, २२, २८.**

नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील वरील ११ जागांपैकी ३ जागा सोडतीने आरक्षित करावयाच्या आहेत. यासाठीची प्रक्रिया सुरु होत असल्याचे सांगणेत आले. प्रथम पारदर्शक ड्रम मध्ये कोणत्याही प्रकारची चिठ्ठी नसून ड्रम रिकामा असलेबाबत उपस्थित नागरिकांना दाखविणेत आला. यानंतर ११ प्रभागातील जागांच्या चिठ्ठया एक एक करुन प्रभागाचा क्रमांक नागरिकांना वाचून दाखविणेत आला. प्रभागातील ११ जागांच्या चिठ्ठया रोल करुन त्याच्या मधोमध रबरबँड लावून चिठ्ठया ड्रममध्ये टाकणेत आल्या. ड्रम उलट-सुलट दिशेने फिरवून चिठ्ठयांची सरमिसळ उलटसुलट करणेत आली. सरमिसळ करणेत आलेल्या चिठ्ठयांमधून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील नेमून देणेच्या ३ जागांची सोडत शालेय विद्यार्थ्यांमार्फत काढणेची कार्यवाही सुरु करणेत आली. सोडतीमध्ये निघालेल्या प्रत्येक चिठ्ठीचा क्रमांक शालेय विद्यार्थ्यांने नागरिकांना दर्शवून व वाचून दाखविला. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील ३ जागांची सोडत कार्यवाही पूर्ण करणेत आली.

| **चिठ्ठी** | **सोडतीने चिठ्ठीत निघालेल्या प्रभागाचा क्रमांक** |
|---|---|
| पहिली चिठ्ठी | १८ |
| दुसरी चिठ्ठी | ०३ |
| तिसरी चिठ्ठी | १२ |

सोडतीने आरक्षित झालेल्या नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची त्या प्रभागातील दुस-या ३ जागांचे क्रमांक नागरिकांना स्क्रीनवर व वाचून दाखविण्यात आले. खालील नमूद प्रभागातील दुसरी जागा ही नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित झालेचे घोषित करणेत आले.

| अनुक्रमांक | जागा क्रमांक |
|---|---|
| १ | प्रभाग क्रमांक १८ जागा ब |
| २ | प्रभाग क्रमांक ०३ जागा ब |
| ३ | प्रभाग क्रमांक १२ जागा ब |

अशाप्रकारे नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित झालेल्या ३५ जागा पूर्ण करण्यात आल्या.

१२) **नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठींचे जागांचे आरक्षण -** नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील आरक्षित झालेल्या ३५ जागांपैकी महिलांसाठी राखून ठेवावयाच्या ५० टक्के जागा म्हणजे मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.२३/०९/२०१६ रोजी मंजूरी दिलेनुसार १८ जागा महिलांसाठी आरक्षित करावयाच्या असलेबाबत सांगणेत आले. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठीचे जागा आरक्षणाची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

अ) नियम ६ (३) (अ) मधील तरतूदीनुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गा करीता २ जागा राखीव असतील त्या प्रभागातील १ जागा थेट पध्दतीने महिलांसाठी आरक्षित ठेवण्याची तरतूद आहे. यानुसार खालील प्रभागातील जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यासाठी आरक्षित झालेले आहेत. त्याचे क्रमांक नागरिकांना स्क्रीनवर दर्शवून व वाचून दाखविण्यात आले.

| जागा क्रमांक | जागा क्रमांक |
|---|---|
| प्रभाग क्रमांक ०३ जागा अ | प्रभाग क्रमांक ३ जागा ब |
| प्रभाग क्रमांक १२ जागा अ | प्रभाग क्रमांक १२ जागा ब |
| प्रभाग क्रमांक १८ जागा अ | प्रभाग क्रमांक १८ जागा ब |

वरिल प्रभागातून प्रत्येकी १ जागा थेट पध्दतीने नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित होत असल्याचे सांगणेत आले. नागरिकांना खालील प्रभागाचे क्रमांक स्क्रीनवर दर्शवून व वाचून दाखविण्यात आले.

| अनुक्रमांक | जागा क्रमांक |
|---|---|
| १ | प्रभाग क्रमांक ०३ जागा ब |
| २ | प्रभाग क्रमांक १२ जागा ब |
| ३ | प्रभाग क्रमांक १८ जागा ब |

ब) यानंतर नियम ६ (३)(ब) मध्ये एक किंवा अधिक जागा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा दोन्ही करीता राखीव असतील, परंतु त्या जागा त्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव नसतील तर अशा प्रभागातील **नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची जागा महिलांकरीता थेट आरक्षित ठेवण्यात येतील अशी तरतूद आहे.**
यानुसारचे प्रभाग खालील प्रमाणे असल्याचे स्क्रीनवर दर्शवून व वाचून दाखविण्यात आले.

| अनुक्रमांक | जागा क्रमांक |
|---|---|
| १ | प्रभाग क्रमांक १ जागा ब |
| २ | प्रभाग क्रमांक ४ जागा क |
| ३ | प्रभाग क्रमांक १६ जागा ब |
| ४ | प्रभाग क्रमांक १९ जागा ब |
| ५ | प्रभाग क्रमांक २४ जागा ब |

| | |
|---|---|
| ६ | प्रभाग क्रमांक २७ जागा ब |
| ७ | प्रभाग क्रमांक ३० जागा ब |
| ८ | प्रभाग क्रमांक ३१ जागा ब |
| ९ | प्रभाग क्रमांक ३२ जागा ब |

अशाप्रकारे वरील जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित करण्यात येत असलेबाबत सांगणेत आले.

क) नियम ६ (३) (क) मध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरीता आरक्षित करावयाच्या उर्वरीत जागा वरील नमूद केलेले प्रभाग वगळून सोडतीने नेमून देण्याची तरतूद आहे. त्यानुसार खालील प्रभागातील जागांमधून उर्वरीत जागांची सोडत काढावयाची आहे असे सांगणेत आले. त्या जागेचे प्रभाग क्रमांक प्रभाग क्रमांक खालीलप्रमाणे २० जागांचे प्रभाग क्रमांक वाचून दाखविणेची कार्यवाही सुरु करणेत आली. या दरम्यान काही नागरिकांनी प्रभाग क्रमांक ६ जागा अ अनुसूचित जमातीचे महिलांसाठी आरक्षित झाली आहे. मग पुन्हा या प्रभाग क्रमांक ६ चा सोडतीचा का समावेश करणेत येत आहे, याबाबत विचारणा केली.

नागरिकांचे या प्रश्नावर मा. राज्य शासनाने दि. १३/६/२०१६ रोजीचे अधिसुचनेद्वारे प्रभागामध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका नियम २०१६ निर्गमित केले आहेत. सदर अधिसूचनेतील नियम क्रमांक ६ (३) मधील तरतुदी वाचून दाखवून त्यांचे शंकांचे निरसन करणेत आले. यानंतर सोडत काढावयाच्या २० जागांच्या चिठ्ठया रोल करुन त्यांचे मधोमध रबरबँड लावून टाकणेची कार्यवाही सुरु करणेत आली.

**प्रभाग क्रमांक** – २, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १३, १४,

१५, १७, २०, २१, २२, २३, २५, २६, २८, २९.

या प्रभागातील २० जागांच्या चिठ्ठया रोल करुन त्याच्या मधोमध रबरबँड लावून चिठ्ठया पारदर्शक ड्रममध्ये टाकणेत आल्या. ड्रम उलट-सुलट दिशेने फिरवून चिठ्ठयांची सरमिसळ उलटसुलट करणेत आली. सरमिसळ करणेत आलेल्या चिठ्ठयांमधून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित करावयाच्या ६ जागांची सोडत शालेय विद्यार्थ्यांमार्फत काढणेची कार्यवाही सुरु करणेत आली. सोडतीमध्ये निघालेल्या प्रत्येक चिठ्ठीचा क्रमांक शालेय विद्यार्थ्यांने दर्शवून व नागरिकांना वाचून दाखविला. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठीच्या ६ जागांची सोडत कार्यवाही पूर्ण करणेत आली.

| चिठ्ठी | चिठ्ठीत निघालेल्या प्रभागाचा क्रमांक |
|---|---|
| पहिली चिठ्ठी | २३ |
| दुसरी चिठ्ठी | ६ |

| | |
|---|---|
| तिसरी चिठ्ठी | ११ |
| चौथी चिठ्ठी | ८ |
| पाचवी चिठ्ठी | २५ |
| सहावी चिठ्ठी | २ |

आरक्षित झालेल्या ६ जागांचे क्रमांक नागरिकांना स्क्रीनवर दर्शवून व वाचून दाखविण्यात आले. खालील नमूद प्रभागातील नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित झालेचे घोषित करणेत आले.

| अनुक्रमांक | जागा क्रमांक |
|---|---|
| १ | प्रभाग क्रमांक २ जागा अ |
| २ | प्रभाग क्रमांक ६ जागा ब |
| ३ | प्रभाग क्रमांक ८ जागा ब |
| ४ | प्रभाग क्रमांक ११ जागा ब |
| ५ | प्रभाग क्रमांक २३ जागा ब |
| ६ | प्रभाग क्रमांक २५ जागा ब |

अशाप्रकारे नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित झालेल्या १८ जागांचे क्रमांक नागरिकांना स्क्रीनवर दर्शवून व वाचून दाखविण्यात आले.

| प्रभाग क्रमांक | जागा अ | जागा ब | जागा क | जागा ड |
|---|---|---|---|---|
| १ | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | -- | -- |
| २. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | -- | -- | -- |
| ३. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | -- | -- |
| ४. | -- | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | -- |
| ५. | -- | -- | -- | -- |
| ६. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | -- | -- |
| ७. | -- | -- | -- | -- |
| ८. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | -- | -- |
| ९. | -- | -- | -- | -- |
| १०. | -- | -- | -- | -- |
| ११. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | -- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| १३. | -- | -- | -- | -- |
| १४. | -- | -- | -- | -- |
| १५. | -- | -- | -- | -- |
| १६. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| १७. | -- | -- | -- | -- |
| १८. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| १९. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| २०. | -- | -- | -- | -- |
| २१. | -- | -- | -- | -- |
| २२. | -- | -- | -- | -- |
| २३. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| २४. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| २५. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| २६. | -- | -- | -- | -- |
| २७. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| २८. | -- | -- | -- | -- |
| २९. | -- | -- | -- | -- |
| ३०. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| ३१. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| ३२. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |

१३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यासाठीच्या महिलांचे जागेसह आरक्षित झालेल्या सर्व जागांचा तक्ता उपस्थित नागरीकांना स्क्रीनवर दर्शवून वाचून दाखविणेत आला.

१४) सर्वसाधारण महिलांसाठीच्या जागा - यानंतर सर्वसाधारण महिलांकरीता जागा आरक्षणाची प्रक्रिया सुरु करणेत आली. नियम ६ (४) तरतुदीनुसार ज्या प्रभागामध्ये २ जागा महिलांकरीता आरक्षित झालेल्या नाहीत. त्या प्रभागात ते प्रमाण पूर्ण करण्या करीता आवश्यक असलेल्या प्रमाणात सर्वसाधारण महिलांच्या ३४ जागा नेमून देणे आवश्यक आहे.त्यानुसार खालील सर्वसाधारण महिलांकरीता जागा आरक्षित होत असल्याचे घोषित करण्यात आले.

**प्रभाग क्रमांक –** १ क, २ ब, ३ क, ४ ड, ५ ब, ५ क, ७ ब, ७ क, ९ क, १० क, १२ क, १३ क, १४ ब, १४ क, १५ ब, १५ क, १६ क, १७ ब, १७ क, १८ क, १९ क, २० क, २१ क, २२ ब, २२ क ,२४ क, २६ क, २७ क, २८ ब, २८ क, २९ ड, ३० क, ३१ क, ३२ क.

१५)अशा प्रकारे महिलांसाठी एकूण ३२ प्रभागांमधून ६४ जागांचा तक्ता नागरिकांना स्क्रीनवर दर्शवून वाचून दाखविणेत आला.

| प्रभाग क्रमांक | जागा अ | जागा ब | जागा क | जागा ड |
|---|---|---|---|---|
| १ | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| २. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | -- | -- |
| ३. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| ४. | -- | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला |
| ५. | -- | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| ६. | अनुसूचित जमाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| ७. | -- | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| ८. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| ९. | अनुसूचित जाती-महिला | -- | सर्वसाधारण - महिला | -- |
| १०. | अनुसूचित जाती-महिला | -- | सर्वसाधारण - महिला | -- |
| ११. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| १२. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| १३. | अनुसूचित जाती-महिला | -- | सर्वसाधारण - महिला | -- |
| १४. | -- | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| १५. | -- | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| १६. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| १७. | -- | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| १८. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| १९. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| २०. | अनुसूचित जाती-महिला | -- | सर्वसाधारण - महिला | -- |
| २१. | अनुसूचित जाती-महिला | -- | सर्वसाधारण - महिला | -- |
| २२. | -- | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| २३. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| २५. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | -- | -- |
| २६. | अनुसूचित जाती-महिला | -- | सर्वसाधारण - महिला | -- |
| २७. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| २८. | -- | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| २९. | -- | अनुसूचित जमाती-महिला | -- | सर्वसाधारण - महिला |
| ३०. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| ३१. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |
| ३२. | -- | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग-महिला | सर्वसाधारण - महिला | -- |

१६)यानंतर उर्वरीत जागा सर्वसाधारण म्हणून राहतील असे घोषित करण्यात आले.

१७)अशाप्रकारे सर्व प्रभागांचे क्रमांक,व्याप्ती, जागानिहाय आरक्षण आरक्षण प्रभागातील समाविष्ठ भाग, नकाशा नागरिकांना स्क्रिनवर दाखविणे व वाचून दाखविणेत आले.

| प्रभाग क्रमांक | जागा अ | जागा ब | जागा क | जागा ड |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| २. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| ३. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| ४. | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला |
| ५. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| ६. | अनुसूचित जमाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| ७. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| ८. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| ९. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| १०. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| ११. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण | सर्वसाधारण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रवर्ग- महिला | | |
| १२. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| १३. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| १४. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| १५. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| १६. | अनुसूचित जाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| १७. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| १८. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| १९. | अनुसूचित जाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| २०. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| २१. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| २२. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| २३. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| २४. | अनुसूचित जाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| २५. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| २६. | अनुसूचित जाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| २७. | अनुसूचित जाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| २८. | रिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| २९. | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती-महिला | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण - महिला |
| ३०. | अनुसूचित जाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| ३१. | अनुसूचित जाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |
| ३२. | अनुसूचित जाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला | सर्वसाधारण - महिला | सर्वसाधारण |

प्रभाग क्र.१ ते २९ मधील जागांचे आरक्षण व व्याप्ती स्क्रीनवर दर्शविणे व वाचून दाखविणेची कार्यवाही पूर्ण झालेनंतर श्री. मारुती भापकर व काही पत्रकार यांनी मा. आयुक्त यांना निवडणूक विभाग प्रभागाची व्याप्ती, नकाशा स्क्रिनवर दाखविणेची जी कार्यवाही करीत आहात याबाबत प्रभागाची रचना या अगोदरच माहित झालेली आहे. प्रभाग रचना बाहेर माहिती झाली आहे, मग आता पुन्हा ही कार्यवाही का करीत आहात याबाबत प्रश्न विचारणेत आला.

मा. आयुक्त यांनी प्रभागा बाबतच्या बातम्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्या असल्या तरी त्याचा निवडणूक विभागाशी काही संबंध येत नाही. मा. राज्य निवडणूक आयोगाने प्रारुप प्रभाग रचनेस दि. २३/९/२०१६ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये कोणालाही बदल करता येत नाही. मा. राज्य निवडणूक आयोगाचे वेळापत्रकाप्रमाणे आज दि. ७/१०/२०१६ रोजी आरक्षित जागांची सोडत झालेली आहे. आम्ही प्रभागाची व्याप्ती, आरक्षित जागा, नकाशा याचा तपशिल दाखवित आहोत. नागरिकांना आयोगाचे वेळापत्रकानुसार प्रभाग रचनेवर दि. १०/१०/२०१६ ते २५/१०/२०१६ या कालावधीत हरकत घेता येणार आहे. त्यावेळेस आपणांस प्रभाग रचनेबाबत हरकती नोंदविता येतील असे मा.आयुक्तसो यांनी सांगितले.

मा. आयुक्त यांनी सहा. आयुक्त, निवडणूक यांना आरक्षित झालेल्या सर्व जागा, प्रभागाचे क्रमांक, प्रभागाची व्याप्ती, नकाशा नागरिकांना दाखविण्याची कार्यवाही पुढे सुरु करावी. तसेच आरक्षण सोडतीचा प्रभागातील सर्व जागांचा तपशील जाहिर करणेबाबत सूचना दिल्या.

१८) मा. आयुक्त यांचे आदेशानुसार प्रभाग क्रमांक, जागांचे आरक्षण, प्रभागातील समाविष्ठ भाग, त्याची व्याप्ती, प्रभागाच्या हद्दीच्या सीमा व नकाशा नागरिकांना स्क्रिनवर दर्शवून व वाचून दाखविणेत आले.

१९) मा. राज्य निवडणूक आयोगाचे राखीव जागांचे आरक्षण व सोडत प्रक्रिया पूर्ण झाली असून त्यानुसार आरक्षित झालेल्या जागांचा तपशील सर्व नागरिकांना वाचून दाखविणेत आला.

२०) प्रभाग रचनेच्या या सोडतीनंतर दि. १०/१०/२०१६ रोजी प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत येणार आहे. तसेच प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना दाखल करणेची मुदत दि. १०/१०/२०१६ ते २५/१०/२०१६( कार्यालयीन कामकाजाचे दिवशी) व दि. २५/१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील. हरकती व सूचना दाखल करणेची ठिकाणे निवडणूक विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुख्य कार्यालय इमारत, पिंपरी, पुणे - ४११०१८ व महानगरपालिकेची अ,ब,क,ड,ई,फ क्षेत्रीय कार्यालये अशी आहेत याची नागरिकांनी नोंद घ्यावी अशा सूचना देणेत आल्या.

अशाप्रकारे एकूण ३२ प्रभागांमध्ये राखीव जागांचे आरक्षण, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला इत्यादी करीता आरक्षण सोडतीचा कार्यक्रम शांतता राखून सहकार्य केलेबद्दल उपस्थितांचे आभार मानून संपला असल्याचे जाहीर करण्यात आले.

आयुक्त
पिंपरीचिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

क्रमांक –निवडणूक / 9 /कावि/ 408 /२०१६,
दिनांक - ७ ऑक्टोबर २०१६